## १. राज्य

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**
१) इंग्रजी भाषेतील Nation हा शब्द **Nasci** या लॅटिन भाषेतील शब्दापासून निर्माण झाला आहे.
२) उदार मतवादी राष्ट्राचा उगम **फ्रेंच** राज्यक्रांतीत झाला.

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**
१. अॅरिस्टॉटल – जर्मन विचारवंत
२. जाँ बाँदे – फ्रेंच विचारवंत
३. वुड्रो विल्सन – अमेरिकन विचारवंत
४. हॅरॉल्ड लास्की – ब्रिटिश विचारवंत
**उत्तर : दुरुस्त जोडी :**
**१) अॅरिस्टॉटल – प्राचीन ग्रीक विचारवंत**

**(क) दिलेल्या विधांनासाठी समर्पक संकल्पना लिहा.**
१) राजकीय पातळीवर लोकांना देशाशी एकनिष्ठ करणारी शक्ती.
**उत्तर : राष्ट्रवाद**

२) ज्या भूप्रदेशावर राज्याला शासन करण्याचा अधिकार आहे.
**उत्तर : अधिकार क्षेत्र**

**प्र. २ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा :**
**१) प्रगतीक राष्ट्रवाद लोकांमध्ये तेढ निर्माण करू शकतो.**
**उत्तर :** हे विधान **चूक** आहे.
**कारण :** आक्रामक राष्ट्रवाद लोकांमध्ये तेढ निर्माण करू शकतो.

**२) सार्वभौमत्व म्हणजे देशाला स्वातंत्र्यपणे निर्णय घेण्याचा अधिकार.**
**उत्तर :** हे विधान **बरोबर** आहे.
कारणे : १) पारतंत्र्यात असणाऱ्या म्हणजेच सर्वभौमत्व नसलेल्या देशाला स्वातंत्र्यपणे निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता.
२) १९५० साली भारत हे सार्वभौम राष्ट्र झाल्यानंतरच त्यास स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार प्राप्त झाला.

**३) पॅलेस्टाईन हे राज्य आहे.**
**उत्तर :** हे विधान **बरोबर** आहे.
**कारणे :** पॅलेस्टाइन पॅलेस्टाईन जनतेचे अधिकृत प्रतींनिधी म्हणून पॅलेस्टाईन मुक्ति संघटनेला (PLO) संयुक्त राष्ट्राची मान्यता आहे.
२) गाझा आणि वेस्ट बँक हा प्रदेश पॅलेस्टाईनचा भूप्रदेश म्हणून जाहीर केला आहे.
३) सार्वभौम्य सरकार नसलेल्या पॅलेस्टाईनला संयुक्त राष्ट्राच्या शंभरहून अधिक राष्ट्रांनी राज्याचा दर्जा बहाल केला आहे.

**४) प्रसारवदी राष्ट्रवाद हा आक्रमक राष्ट्रावादाचा प्रकार आहे.**
**उत्तर :** हे विधान **बरोबर** आहे.
कारण : १) काही राष्ट्रे राष्ट्रीय गौरवसाठी आक्रमक होतात.
२) अशी राष्ट्रे वसाहती साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

**प्र. ३ आपले मत नोंदवा :**
**१) भारत एक राज्य आहे.**
**उत्तर :** भारत एक राज्य आहे, या विधांनशी मे सहमत आहे. त्याची कारणे पुढीले प्रमाणे:
१) १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.
२) भारतीयांच्या प्रातींनिधिक घटना परिषदेने भारताच्या संविधानाच्या निर्मितीचे कार्य २६ नोव्हेंबर १९४९ रोजी पूर्ण केले.
३) भारताच्या संविधानाच्या अंमलबजावणीची सुरुवात २६ जानेवारी १९५० पासून झाली.
४) भारताचा भूप्रदेश खंडप्राय आहे.
५) भारताने संसदीय लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला आहे.
६) भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक व प्रादेशिक विविधाता असणारी भारताची लोकसंख्या १४० कोटींपेक्षा अधिक आहे.

**प्र. ४ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**१) राष्ट्राची वैशिष्टे कोणती आहेत ?**
**उत्तर :** राष्ट्राची वैशिष्टे पुढील प्रमाणे :
**१) लोकसंख्या :** राष्ट्रानिर्मितीसाठी लोकसंख्या आवश्यक आहे.
**२) भूप्रदेश :** राष्ट्रानिर्मितीसाठी लोकसमुदायाचे विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात कायमस्वरूपी वास्तव आवश्यक आहे.
**३) समान भाषा, समान धर्म व समान संस्कृती :** विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या लोकसमुसायची भाषा समान असते, त्यांचा धर्म व संस्कृती समान असते, तर त्यांच्यात भावनिक एकात्मता निर्माण होण्यास सहाय्य होते.
**४) ऐक्याची भावना :** राष्ट्रानिर्मितीचा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे लोकसमुदायात असलेली एकात्मतेची भावना. या लोकसमुदायात वंश, भाषा , धर्म किंवा संस्कृतीची विभिन्नता असली तरी एकत्र राहिल्याने त्यांचात एकात्मतेची भावना आणि आपण राष्ट्र आहोत अशी जाणीव असेल, तरच राष्ट्रावडची निर्मिती होते.
**५) राजकीय स्वातंत्र्याची आकांक्षा :** भारतासारख्या परकीय राज्यावतीखाली असलेल्या देशातील लोकसमुदायात स्वयंशासनाची, म्हणजेच स्वातंत्र्यप्राप्तीची आकांक्षा निर्माण होते, तेव्हा राष्ट्रनिर्मितीस चालना मिळते.
**६) राजकीय वेगळेपणाची जाणीव :** सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व भाषिक समानता असणारा लोकसमुदाय जेव्हा विशिष्ट भूप्रदेशात प्रदीर्घ काळ वास्तव्य करतो, तेव्हा त्यांच्यात राजकीय वेगळेपणाची जाणीव निर्माण होते. ते ‘स्वकीय ’ आणि ‘परकीय’ यांच्यात भेद करतात आणि त्यातून राष्ट्रानिर्मितीस चालना मिळते. उत्तर अमेरिका खंडातील तेरा ब्रिटिश वसाहतींत जेंव्हा राजकीय वेगळेपणाची जाणीव निर्माण झाली, तेव्हा अमेरिकन राष्ट्र निर्माण झाले.

**२) राष्ट्रवाद म्हणजे काय ते सांगून त्याचे विविध प्रकार स्पष्ट करा.**
**उत्तर : अ) राष्ट्रवाद :** राष्ट्रवाद हा लोकसमुदायास राष्ट्राशी एकनिष्ट करणारी शक्ती आहे. राष्ट्रवाद

लोकसमुदायास संघटित करून, राष्ट्रासाठी विधायक करी करण्यासाठी प्रवृत्त करतो. राष्ट्रवाद राजकीय अस्मिता असते, जी लोक समुदायास भावनिक पातळीवर राष्ट्राशी जोडते. राष्ट्रप्रेमच्या भावणेमुळे राष्ट्रस ' भारतमाता ' , ' Motherland ', 'Fatherland' असे म्हणतात. राष्ट्राभिमानामुळे युद्धादरम्यान लोक सैन्यात भारती होतात किंवा अन्य प्रकारे सैन्यदलाला पाठिंबा देतात. अशा प्रकारे राष्ट्रवाद राजकीय पातळीवर लोकान्न देशाशी एकनिष्ठ करणारी शक्ति आहे.

**ब) राष्ट्रावडचे प्रकार :** राजकीय दृष्टीकोणातून राष्ट्रावादाचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

**१) उदार मतवादी किंवा प्रगतीक राष्ट्रवाद :** राष्ट्र आणि सार्वभौमत्वाची सांगड घालून देणाऱ्या राष्ट्रवादास असे म्हणतात. राष्ट्राध्यक्ष विल्सन यांचे स्वयंनिर्णयाचे तत्त्व उदारमतवादी राष्ट्रवादावर आधारित आहे. त्यानुसार प्रत्येक राष्ट्राकाला (Nationality) स्वातंत्र्य आणि सार्वभौमतवाचा अधिकार आहे.

**२) परांपरनिष्ट किंवा संकुचित राष्ट्रवाद :** परंपरावादी राष्ट्रवाद संकुचित निष्ठांवर आधारित असतो. स्वातंत्र्यपूर्व काळात मुस्लिम लीगणे धर्माच्या आधारे पाकिस्तानची मागणी केली होती. अमेरिकी राष्ट्राभिमान हे या राष्ट्रवादाचे वैशिष्ट आहे.

**३) विस्तारवादी किंवा आक्रमक राष्ट्रवाद :** संकुचित राष्ट्रावडप्रमाणेच जर्मनीतील विस्तारवाडी राष्ट्रीय गौरवामागे आक्रमक भूमिकेचे समर्थन करतो. त्याचप्रमाने राष्ट्रहित जोपासण्यासाठी इंग्लंड सारख्या यूरोपियन देशांनी परकीयनवर आक्रमण करून आपल्या वसाहती साम्राज्याची स्थापना केली होती.

**४)वसाहतवादविरोधी राष्ट्रवाद :** युरोपिय राष्ट्रांच्या विस्तारवाडी राष्ट्रावादाची प्रतिक्रिया म्हणून भारतासारख्या वसाहती देशांत स्वातंत्र्याच्या चळवळी जन्मास आल्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारताने आशिया व आफ्रिका खंडातील वसाहती देशांच्या स्वातंत्र्य लढ्याला वसाहतवादास विरोध या भूमिकेतूनच पाठिंबा दिला होता.

**प्र. ५  खलील प्रशंनांचे उत्तर दिलेल्या मुदद्यांच्या आधारे लिहा.**

**अ) सार्वभौमत्व ब) शासनसंस्था क) लोकसंख्या ड) भूप्रदेश**

**उत्तर** : सार्वभौमत्व : राज्य हे कायदेशीरदृष्ट्या सर्वभौम असते. याचाच अर्थ त्या राज्याला आपले कायदे करण्याचा अधिकार असतो. राज्य ही सर्वोच्च सत्ता असल्याने तिचे कायदे राज्यातील सर्व व्यक्ति व संस्थांवर बंधनकारक असतात. या अधिकारास अंतर्गत सार्वभौमत्व असे म्हणतात. तसेच राज्य हे स्वातंत्र्य असल्याने, म्हणजेच कोणत्याही परकीय राज्याचे नियंत्रण त्यावर नसल्याने ते आपले परराष्ट्र धोरणविषयक निर्णय स्वतंत्रपणे घेऊ शकते. या अधिकारास बहिगर्त सार्वभौमत्व असे म्हणतात.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाल्या नंतर १९५० साली भारताच्या संविधानाच्या सरनाम्यात भारत 'सार्वभौम राज्य' असल्याचे घोषित करण्यात आले. १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी भारत ब्रिटिश साम्राज्यातील वसाहत होती. म्हणजेच सर्वभौमत्वाच्या अभावे भारत हे राज्य नव्हते.

**ब) शासनसंस्था :** राज्य ही अमृत संकल्पना आहे, तिच्या संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचे कार्य, म्हणजेच राज्याच्या सार्वभौम सत्तेचा वापर करणाऱ्या संस्थेस शासनसंस्था असे म्हणतात. राज्याची प्रतींनिधिक संस्था म्हणून शासनसंस्था कायदे करणे, कायद्याची कार्यवाही करणे, आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस किंवा संस्थेस शिक्षा करणे, म्हणजेच न्यायदान करणे ही कार्ये करते. आधुनिक राज्यात ही कार्ये शासनसंस्थेच्या घटकसंस्था, म्हणजेच कायदेमंडळ आणि न्यायमंडळ पार पाडतात.

**क) लोकसंख्या :** राज्य अस्तित्वात याण्यासाठी लोकसंख्या आवश्यक असते. राज्याच्या भाऔगोलिक क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्यांना राज्याचे नागरिक असे म्हणतात. राज्याचे नागरिक म्हणून त्यांना काही अधिकार दिले जातात आणि राज्याद्वारे निर्धारित कर्तव्यांचे पालन त्यांनी करावे असे अपेक्षित असते. लोकशाही शासनपद्धती असलेल्या राज्यात नागरिक लोकप्रतिनिधींची निवड करतात. राज्याची लोकसंख्या कमी

अधिक असू शकते. त्यास लोकसंख्येचा सख्यात्मक पैलू असे म्हणतात. संखेपेक्षा नागरिकांची गुणवत्ता अधिक महत्त्वाची समजली जाते.

**ड) भूप्रदेश :** ज्या भुक्षेत्रावर राज्याला शासन करण्याचा अधिकार असतो, त्यास राज्याचा भूप्रदेश असे म्हणतात. म्हणजेच राज्याच्या सीमेच्या अंतर्गत असलेल्या भुक्षेत्रास भूप्रदेश असे म्हणतात. म्हणजेच राज्याच्या सीमेच्या अंतर्गत असलेल्या भुक्षेत्रास भूप्रदेश असे म्हणतात. भूपरदेशाचे तीन घटक म्हणजे, राष्ट्राच्या सीमेच्या अंतर्गत असलेली प्रत्यक्षय भूमी, किनारपट्टीलागतचा, म्हणजेच किनरपट्टीपासून 12 नॉटिकल मैल असलेला सपाटी प्रदेश आणि राज्याच्या भूप्रदेशवरील आकाशाचा भाग. राज्याचा भूप्रदेश कमी अधिक असू शकतो. भारताचा भौगोलिक विस्तार खंडपरे आहे, त्याच्या तुलनेत भूतानच भूप्रदेश लहान आहे.